# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### दारव्हा व यवतमाळ (जि.यवतमाळ) कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(१) ८७६० (१३-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा व यवतमाळ (जि.यवतमाळ) कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी नाला खोलीकरण व सिमेंट बंधाराच्या कामात अंदाजपत्रक वाढवून आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी पुणे कृषि आयुक्तालय यांच्या दक्षता पथकाने दिनांक १४ जून, २०१७ रोजी चौकशी करुन दिनांक १६ जुलै, २०१७ रोजी अमरावतीतील कृषि संचालकांकडे पाठविलेल्या अहवालावर कोणतीच कार्यवाही कृषि विभागाकडून करण्यात न आल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाला खोलीकरण व सिमेंट बंधाऱ्यांच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या दोषी कृषि अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१७-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अकोला यांच्या अध्यक्षतेखाली दारव्हा व यवतमाळ उपविभागातील कामांची तपासणी करण्याकरीता चौकशी समिती गठीत केली आहे. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून अतिप्रदानाची रक्कम वसूल करुन त्यांची विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून अधिकारी / कर्मचारी निहाय रक्कम निश्चित करण्याची कार्यवाही संचालक (मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन) यांचे स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथे जमीन व्यवहारात फसवणूक झाल्याबाबत

**(२) १०८४३ (०६-०१-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील सीबीडी, बेलापूर सेक्टर १५ येथील रिअल इस्टेटचा व्यवसाय करणाने किसन धावजी राठोड व त्यांच्या कार्यालयातील सहकारी यांनी मौजे जुई (ता.उरण) येथील शेतकरी घनश्याम भोईर यांना जमीन खरेदीबाबत खोटी माहिती देवून अस्तित्वात नसलेल्या जमिनीचा व्यवहार करुन रुपये पावणे दोन कोटींची फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन मिळकत विक्री केलेल्या ग्राहकांना रजिस्टर खरेदीखत करुन दिल्यानंतर सातबारा नोंद करतेवेळी या क्षेत्राचे आकारबंध जुळले नसून त्यामुळे सातबारा नोंदी झाल्या नाहीत त्यावेळी जमीन विक्री केलेल्या ग्राहकांनी जमीन मोजणी करण्याकरीता भूमी अभिलेख कार्यालय, रायगड यांचेकडे अर्ज केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घन:शाम भोईर व त्यांचे सहकारी योगेश खारपाटील यांनी किसन धावजी राठोड यांचेशी केलेल्या व्यवहारातील सर्व्हे नंबर ९८/३६/अ अस्तित्वात नसल्याचे भूमिअभिलेख कार्यालयाकडून संबंधित ग्राहकास कळविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तत्कालीन तहसिलदार तथा संबंधित दोषींची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी गुन्हेगारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे उरण ता.उरण जि.रायगड येथील स.नं.९८/३६/अ एकूण क्षेत्र ०-९७.२० हे.आर पैकी क्षेत्र ०-१७.० हे.आर श्री.घन:शाम नामदेव भोईर यांचे वतीने अखत्यारी श्री.किसनराव धावजी राठोड यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने श्री.शामलाल बर्मण व इतर ९ यांनी खरेदी केली आहे. जमीन खरेदीदार श्री.श्यामलाल बर्मन यांनी उक्त क्षेत्राची मोजणी करुन मिळणेबाबत उप अधीक्षक भूमि अभिलेख, उरण यांचेकडे केलेल्या अर्जास अनुसरुन उप अधीक्षक भूमि अभिलेख, उरण यांचे दिनांक ०८/०९/२०२० च्या पत्रानुसार स.नं.९८/३६/अ चे ७/१२ सदरी ०-९७.२ हे.आर क्षेत्र दाखल आहे. परंतु भूमि अभिलेख कार्यालयाकडील मूळ अभिलेख (आकारबंदाची) खात्री केली असता स.नं ९८/१/३६ चे क्षेत्र ०-११.९ हे.आर असून ७/१२ वरील क्षेत्र व आकारबंदाचे क्षेत्र यामध्ये तफावत असलेने मोजणी करता येत नसल्याचे कळविले आहे.

सदर प्रकरणी स.क्र.९८/३६/अ व स.क्र ११६/९ या ७/१२ चे क्षेत्र मेळात नसल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ अन्वये सुनावणी अंती दिनांक १२/०४/२०२१ चे आदेशान्वये सदर दोन्ही ७/१२ बंद केले आहेत.

उक्त सर्वे क्रमांकाचा आकारबंदात उल्लेख नसताना ७/१२ हस्तलिखित पुस्तकामध्ये बनावट स्वरुपात लिहिणारे व तद्नंतर बनावट हस्तलिखीत ७/१२ वरुन संगणीकृत ७/१२ तयार करणारे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील)

नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव (जोडपत्र १ ते ४ सह) तात्काळ सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून उपविभागीय अधिकारी पनवेल यांना कळविले आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी उरण पोलीस ठाणे येथे खाजगी व्यक्तीकडून गुन्हा क्र.२०९/२०२१ दाखल करण्यात आला असून आर्थिक गुन्हे शाखा, कक्ष-२, नवी मुंबई यांचेकडून तपास सुरु आहे.

---

## सांगली जिल्हापरिषदेने खरेदी केलेल्या रुग्णवाहिकांचा वापर करण्याबाबत

**(३) १२०१० (३०-०३-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हापरिषदेने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये ६ नवीन रुग्णवाहिका खरेदी केल्या असून या रुग्णवाहिका वापराविना पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिळाशी, गुडेपाचगणी व मुचंडी प्राथमिक आरोग्य केंद्राची बाधंकाम अनुषंगिक कामे अपूर्ण असल्यामुळे वैद्यकीय अधिकारी तसेच इतर कर्मचारी वर्ग शासनाकडून नेमण्यात आले नसल्यामुळे सदर प्राथमिक आरोग्य केंद्राला रुग्णवाहिका वापरासाठी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्राथमिक आरोग्य केंद्राला वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत तसेच रुग्णवाहिका वापरासाठी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) पद निर्मिती प्रस्ताव दिनांक ८/४/२०२१ व दिनांक ३/८/२०२१ रोजी शासनास (सह संचालक, आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र / दवाखाने) मुबई यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी क्रीडा संकुलासाठी पाटबंधारे विभागाच्या जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) १२०७५ (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक १०६९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या ठिकाणी क्रीडा संकुलासाठी जलसंपदा विभागाच्या वापरात नसलेल्या जागा उपलब्ध करुन द्याव्यात अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री महोदय यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाच्या वापरात नसलेल्या जागा क्रीडा संकुलासाठी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत तालुकानिहाय सविस्तर माहिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-११-२०२२) :** (१) याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी तत्कालीन मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे.
(२) परभणी जिल्ह्यातील पाथरी, सोनपेठ, परभणी, मानवत व पालम तालुका क्रीडा संकुलासाठी जागा प्राप्त करून घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. जिल्ह्यातील उर्वरित गंगाखेड, जिंतुर, सेलू व पूर्णा या तालुका क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५) १२६२६ (३०-०३-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतीच्या विकासाच्या नियोजनानुसार आवश्यक निधी प्राप्त न झाल्याने ग्रामपंचायतीच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील प्रस्तावित कामे ४.९२ लाख इतकी असून त्यातील फक्त नऊ कामे पूर्ण झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावित कामांना गती देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात अनटाईड ग्रँट (अबंधित) च्या पहिल्या हप्त्याच्या स्वरूपात प्राप्त झालेल्या रुपये ८६१.४० कोटी रकमेपैकी राज्यातील ग्रामपंचायतींना दिनांक २०/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये रुपये ६८९.१२ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच टाईड ग्रँट (बंधित) च्या पहिल्या हप्त्याच्या स्वरूपात प्राप्त झालेल्या रुपये १२९२.१० कोटी रक्कमे पैकी राज्यातील ग्रामपंचायतींना दिनांक १०/११/२०२१ च्या शासन परिपत्रकान्वये रुपये १०३३.६८ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील कृषि विभागातील महत्त्वाच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(६) १२७०२ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील उपविभागीय कृषि अधिकारी तसेच तालुका कृषि अधिकारी आणि वाहनचालक ही महत्वपूर्ण पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या या पदांचा प्रभार इतर तालुक्यातील अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आला असून रिक्त वाहनचालक पदी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक घेतले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदांमुळे शेतपिके घेण्यासाठी व रोग व किडीचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणेबाबत सदरहू पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०९-११-२०२२) :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) तालुका कृषि अधिकारी, रामटेक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार मंडळ कृषि अधिकारी, देवलापार यांच्याकडे व उपविभागीय कृषि अधिकारी, रामटेक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार तालुका कृषि अधिकारी, पारशिवनी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांना सोपविल्यामुळे सदर अधिकारी शेतकऱ्यांना शेतपिके घेण्यासाठी व रोग व किडीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध पध्दतीने मार्गदर्शन करीत आहेत व त्यांना सोपविण्यात आलेले शेती संबंधात कामे विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्याचा परीपूर्ण प्रयत्न करीत आहेत.

सरळसेवेच्या कोटयातील महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ (कृषि उपसंचालक) संवर्गातील १९ पदे, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गातील ६१ पदे व महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील १२३ पदे अशी एकूण २०३ पदे भरण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून याबाबतची जाहिरात दिनांक १८/०२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी संवर्गामध्ये पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १२/०४/२०२२ अन्वये ज्या प्रशासकीय विभागानी सुधारीत आकृतीबंध अंतिम मंजूर केले आहेत, अशा सुधारित आकृतीबंधातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळता अन्य पदे ५० % भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. कृषि विभागातील वाहन चालकांची ११३ रिक्त पदे बाह्ययंत्रणेद्वारा भरण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बहूतांशी रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत व उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भूमि अभिलेख विभागातील पदांच्या भरती प्रक्रियेच्या परीक्षेत गैरप्रकार केलेल्या जी. ए. टेक्नॉलॉजी कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(७) १३२६६ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या भूमि अभिलेख विभागातील १००० पेक्षा अधिक पदांच्या भरती प्रक्रियेची परीक्षा दिनांक २३ जानेवारी २०२२ रोजी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते, हे खरे आहे,

(२) असल्यास, या भरती परीक्षेत उमेदवारांची नोंदणी, प्रवेशपत्र देणे, परीक्षा केंद्र निश्चित करणे ही तांत्रिक जबाबदारी म्हाडाच्या परीक्षेत गैरप्रकार केलेल्या वादग्रस्त जी.ए. टेक्नॉलॉजी या कंपनीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या काही काळात राज्याच्या विविध विभागाच्या झालेल्या परीक्षेत गैरप्रकार झाला असल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जी.ए. टेक्नॉलॉजी कंपनीला भूमि अभिलेख पदभरती प्रक्रियेतून वगळण्याबाबत तसेच या वादग्रस्त कंपनीस जबाबदारी सोपविण्याच्या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या विभागाकडून ज्या वेळी जी.ए. टेक्नॉलॉजी या कंपनीची निवड करण्यात आलेली होती त्यावेळी सदर कंपनीबाबत कोणतीही तक्रार या विभागास प्राप्त झालेली नव्हती. मात्र संदर कंपनीबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सदर कंपनीमार्फत भूमि अभिलेख विभागाकडील पदभरतीचे काम स्थगित करण्यात आले आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १८/०१/२०२२ अन्वये पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी निश्चित करण्यात आलेल्या OMR मार्फत परीक्षा घेण्याऱ्या कंपन्याचे पॅनल स्थगित करण्यात आले आहे.

(४) वरील २ प्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरेड (जि.नागपूर) विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) १३५०५ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड विधानसभा क्षेत्रातील (जि.नागपूर) उमरेड, भिवापूर व कुही तालुक्यांमधील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रूग्णालयामधील अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमध्ये वैद्यकीय अधिकारी यांच्यासह शिपाई वर्ग-४ संवर्गातील मंजूर पदांपैकी सुमारे १३६ पदांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या सुरू असलेली कोरोनाची साथ व विविध रोगांचे संक्रमण यामुळे या परिसरातील आरोग्य व्यवस्था प्रभावित होत असल्याने सदर रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उमरेड, भिवापूर व कुही तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रूग्णालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

उमरेड विधानभा क्षेत्रातील कार्यरत असलेल्या ०३ ग्रामीण रुग्णालय व ११ प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी गट अ व ब | ३८ | ३७ | ०१ |
| गट क व ड | २७१ | १८३ | ८८ |
| एकूण | ३०९ | २२० | ८९ |

(३), (४) व (५) सार्वजनिक आरोग्य विभागातील गट क व ड पदभरती परीक्षा दिनांक २४ व ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचे पेपर फुटल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत. ही पदभरती प्रक्रिया दिनांक २९/०६/२०२२ रोजी रद्द करण्यात आली असून सुधारित पदभरती प्रक्रिया सुरू करण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई यांना पत्र देण्यात आले आहे. तसेच, ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक १०/०५/२०२२ अन्वये जिल्हा परिषद आरोग्य विभागातील गट क ची औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका या संवर्गातील पदे जिल्हा निवड मंडळामार्फत भरण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार पदभरतीबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

## मुंबईतील मजूर संस्थाची तपासणी करण्याबाबत

**(९) १३५१९ (२५-०४-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सुमारे साडेसातशेहून अधिक मजूर संस्था असून या संस्थांचे सदस्य खरोखरच मजूर आहेत किंवा नाहीत याची तपासणी करण्याबाबत मा.नागपूर उच्च न्यायालयाने सन २०१७ मध्ये दिलेल्या आदेशानुसार सहकार आयुक्त, पुणे यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देऊनही आजमितीपर्यंत आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची बाब दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (१), (२), (३) व (४) मुंबई यांनी अनुक्रमे ३५३, २०१, १४१, ७१ अशा एकूण ७६६ मंजूर संस्थांना कलम ८९ अे चे आदेश निर्गमित केलेले असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (१), मुंबई यांचेकडे एक मजूर संस्थेची तपासणी पूर्ण झाली असून सदर संस्थेकडून तपासणी अहवालाबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे तर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), (३) व (४) मुंबई या जिल्ह्यांमध्ये एकही तपासणी अद्याप पूर्ण झाली नसल्याचे निदर्शास आले असून संबंधित प्रभाग कार्यालयास जलदगतीने सदर तपासणीचे कामकाज पूर्ण करुन तपासणी अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले असून सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने मुंबईतील मजूर संस्थांचे सदस्य तसेच मजूरांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०९-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विभागामध्ये एकूण ७६६ नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था आहेत. साईबाबा मजूर सहकारी संस्था म., चंद्रपूर यांनी शासनास मजूर सहकारी संस्थांमधील मजूर सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने काही बाबींवर सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती केली होती. मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे संस्थेने दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने संस्थेच्या मागणीबाबत २ महिन्यात निर्णय घेण्याचे आदेश देऊन याचिका खारीज केली होती. त्यानुसार दिनांक २१/०१/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार मजूर सहकारी संस्थेचा सभासद हा फक्त मजुरच असला पाहिजे, संस्थेने मजूरांची नोंदवही ठेवावी, सभासदांच्या कामाबद्दलची मजूरी त्यांच्या बँक खात्यात जमा करावी इ.सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच, सदर तरतूदींचे पालन होते किंवा नाही याबाबत नियंत्रण ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सहकार आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १५/११/२०१७ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा उपनिबंधकांना सदर सूचनांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घेण्याबाबत कळविले आहे. तसेच, दिनांक ३/०१/२०२२ रोजीच्या पत्रानुसार सर्व जिल्हा उपनिबंधकांना मजूर सहकारी संस्थांच्या तपासणी करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (१), मुंबई यांनी त्यांचेकडील ३५३ मजूर सहकारी संस्थांपैकी २२ मजूर सहकारी संस्थांचे कलम ८९ अे अन्वये तपासणी कामकाज पूर्ण केले आहे. तपासणी अहवालाबाबत संबंधित संस्थांकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर सदर बाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), मुंबई यांनी त्यांचेकडील २०१ मजूर सहकारी संस्थांपैकी १३ मजूर सहकारी संस्थांचे कलम ८९ अे अन्वये तपासणी कामकाज पूर्ण करण्यात आले असून अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), मुंबई यांचेकडे १४१ मजूर संस्था असून मजूर संस्थांच्या संचालक मंडळ निवडणूकीची कार्यवाही चालू असल्याने सदर कार्यालयाद्वारे तपासणी पूर्ण झालेली नाही. तपासणीअंती आढळून आलेल्या त्रुटींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई यांनी त्यांचेकडील ७१ मजूर संस्थांपैकी ३ मजूर सहकारी संस्थांचे कलम ८९ अे अन्वये तपासणी कामकाज पूर्ण केले आहे. यापैकी २ संस्थांना अवसायनाचे अंतरिम आदेश निर्गमित केले आहेत तर एका संस्थेस अवसायनपूर्व नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे.

---

## नरखेड (जि.नागपूर) येथील भूमि अभिलेख कार्यालय मधील स्थायी उप अधीक्षकासह इतर रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) १३६०८ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) येथील भूमि अभिलेख कार्यालय मधील उप अधीक्षकासह इतर ६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे १५० गावांचा कारभार असलेल्या तालुक्यातील सध्या हे कार्य प्रभारी उप अधीक्षकाकडे सोपविण्यात आले असून ते नियमित हजर राहाणे शक्य नसल्यामुळे व रिक्त पदांमुळे नागरिकांची कामे खोळंबली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूमि अभिलेख कार्यालयातील उप अधीक्षकांसह इतर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, नरखेड हे पद शासन आदेश दिनांक २७/०५/२०२२ अन्वये भरण्यात आले आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, नरखेड कार्यालयात माहे मार्च, २०२२ अखेर मोजणीची ३५० प्रकरणे शिल्लक होती. माहे एप्रिल, २०२२ अखेर ९९ प्रकरणांची आवक झाली. त्यापैकी ८३ प्रकरणे माहे एप्रिल,२०२२ मध्ये निकाली करणेत आली व ३६६ मोजणी प्रकरणे माहे एप्रिल,२०२२ अखेर शिल्लक आहेत. उप अधीक्षक भूमि अभिलेख, नरखेड कार्यालयातील प्रलंबित मोजणी प्रकरणे व इतर जनतेची कामे जास्त काळ प्रलंबित राहणार नाही यांची दक्षता घेण्यात येत असून जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, नागपूर यांचे कार्यालयामार्फत जिल्ह्यामधील इतर कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग करुन प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच विभागातील रिक्त पदांच्या अनुषंगाने गट-क, पदसमूह-४ भुकरमापक / कनिष्ठ लिपिक संवर्गातील विभागात १२६१ पदे रिक्त असून त्यापैकी १०१३ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेतील निधी वितरण रखडल्याबाबत

**(११) १३६९६ (२५-०८-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना माहे फेब्रुवारी,२०१९ ला सुरू झाली शेतकऱ्यांना चार महिन्यातून २ हजार तर वर्षभरात एकूण ६ हजार रुपयांचा निधी केंद्र शासनाच्या माध्यमातून वितरित होतो, परंतु यंदा राज्यात असमन्वयामुळे पात्र शेतकऱ्यांना निधी वितरण झाले नसल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रसिद्धीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिबिराचे आयोजन करून शेतकऱ्यांच्या नोंदी घेण्याचे नियोजित असताना नियोजनाअभावी शेतकऱ्यांचा डाटा दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी पूर्ण होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना निधी वाटप करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पंतप्रधान किसान सन्मान निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.अब्दुल सत्तार (१४-११-२०२२) :** (१) हे खरे नाही. दिनांक ०६/०९/२०२२ अखेर राज्यातील एकूण ११०.०० लाख लाभार्थ्यांना एकूण रक्कम रुपये २०२३५.९३ कोटी लाभ अदा करण्यात आला आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२० पासून राज्यातील लाभार्थ्यांना लाभ देणे सुरु असून आजअखेर एकूण ११ हप्त्यांच्या लाभाचे वितरण झालेले आहे.

(२) हे, अंशत: खरे आहे.

(३) हे, खरे आहे.

(४) पी.एम. किसान योजनेंतर्गत लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीतील १२ वा हप्ता उपलब्ध होणेसाठी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १८/०८/२०२२ रोजीच्या बैठकीत आणि मा.मंत्री (कृषि) यांच्या दिनांक २३/०८/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशांप्रमाणे राज्यात सर्व समन्वयाने पी.एम. किसान योजनेचे कामकाज सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील औद्योगिक क्षेत्रात सुसज्ज रूग्णालय उभारण्याबाबत

**(१२) १३७७० (२८-०६-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील दिघा ते नेरूळ परिसरातील भूमिपुत्रांच्या जमिनी औद्योगिक विकास महामंडळाने विकत घेतल्या असून सदर औद्योगिक क्षेत्रात सद्य:स्थितीत साडेचार हजार कारखाने/कंपन्या कार्यरत असून चाळीस हजार कर्मचारी काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी एखाद्या कामगाराचा अपघात झाल्यास उपचारासाठी मुलूंड येथील पंधरा किलोमीटर लांब असणाऱ्या शासकीय रूग्णालयात किंवा मनपाच्या प्रथम संदर्भ रूग्णालयात उपचारासाठी जावे लागत असून अत्यंत गंभीर रूग्णाला तात्काळ उपचार मिळण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात सुसज्ज रूग्णालय उभारण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औद्योगिक क्षेत्रात रुग्णालय उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी/स्थानिक प्रशासनाने पत्रव्यवहार केला आहे काय व त्यावर कोणती कार्यवाही केली,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर औद्योगिक क्षेत्रात कामगारांसाठी रुग्णालय उभारण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

उद्योग संचालनालयाकडून प्राप्त माहितीनुसार नवी मुंबईतील दिघा ते नेरूळ क्षेत्रात एकूण ४६०९ कारखाने/कंपन्या/उपक्रम कार्यरत असून एकूण ३३,५२० एवढी रोजगार निर्मिती झालेली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी मार्फत ऑगस्ट २०२१ मध्ये ज्या ठिकाणी राज्य कामगार विमा योजनेचे रूग्णालये कार्यरत नाही त्या ठिकाणी खाजगी रूग्णालयांमार्फत विनामुल्य वैद्यकीय सेवा विमारूग्णांना पुरविता याव्यात याकरीता जाहिरात देण्यात आली होती. तथापि, सदर जाहिरातीमध्ये दिघा ते नेरूळ या परिसरातील खाजगी रूग्णालयांनी सहभाग घेतला नसून सदर परिसराला लागून असलेले सुयश रूग्णालय सिव्हूडस, नवी मुंबई व इनफिगो आय केअर वाशी, नवी मुंबई या दोन रूग्णालयांसमवेत टाय-अप करण्यात येऊन सदर परिसरातील विमारूग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे.

नवी मुंबई व सभोवतालच्या परिसरासाठी अतिविशेषोपचारांकरीता (Super Speciality Treatment) राज्य कामगार विमा महामंडळाकडून २६ खाजगी रूग्णालयांशी टाय-अप करण्यात आले आहे.
(३) पनवेल जिल्ह्याकरीता कामगारांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्यासंदर्भात तळोजा इंडस्ट्रीयल असोसिएशन ने दिनांक २८/१२/२०२० रोजी राज्य कामगार विमा महामंडळाकडे निवेदन सादर केले आहे. तसेच सदर विषयाबाबत रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक व बांधकाम कामगार मजदूर युनियन यांचे दिनांक ०२/०६/२०२० चे निवेदन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे. दिनांक ०२/०६/२०२० चे पत्र आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित करण्यात आले आहे.
(४) राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नवीन रूग्णालये उभारण्याची धोरणात्मक बाब राज्य कामगार विमा महामंडळ मुख्यालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित आहे.

राज्य कामगार विमा योजनेंतर्गत राज्यात चाकण (पुणे), जळगाव, सातारा, पेण (रायगड), तारापूर (पालघर) व पनवेल (रायगड) या ठिकाणी नवीन ०६ राज्य कामगार विमा रूग्णालये व सदर दिघा ते नेरूळ परिसरामध्ये रबाळे, महापे, तुर्भे व नेरूळ या ठिकाणी ०४ नवीन राज्य कामगार विमा सेवा दवाखाने सुरू

करण्याबाबत राज्य कामगार विमा महामंडळ मुख्यालय, नवी दिल्ली मार्फत दिनांक १८/०६/२०२२ रोजी संपन्न राज्य कामगार विमा महामंडळाच्या १८८ व्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. त्यासंदर्भात राज्य कामगार विमा महामंडळाकडून एम.आय.डी.सी कडे जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच, रायगड जिल्ह्याकरीता राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, वाशी व्यतिरिक्त पनवेल येथे १०० खाटांचे रुग्णालय उभारण्यास राज्य कामगार विमा महामंडळाने मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यासह राज्यातील शेतकरी डीएपी खताच्या तुटवड्यामुळे अडचणीत आल्याबाबत

**(१३) १४१६५ (३०-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अकोला जिल्ह्यासह शासनाने माहे एप्रिलमध्ये २३०० मे.टन व माहे मे,२०२२ मध्ये ४००० मे.टन असा एकूण ६३०० मे.टन डीएपी खतांचा पुरवठा करणेबाबत खत उत्पादक कंपनीला कृषि आयुक्तालयाने लक्षांक दिलेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने खरीप हंगाम-२०२२ करीता अकोला जिल्ह्यांसाठी महिनानिहाय मंजूर केलेल्या खत पुरवठ्यानुसार माहे एप्रिल व मे,२०२२ या महिन्यांसाठी अनुक्रमे १९८८ मे.टन व २४४६ मे.टन इतका डीएपी खताचा पुरवठा मंजूर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असताना त्यापैकी अकोला जिल्ह्यात फक्त १७२६ मे.टन डीएपी खताचा पुरवठा करण्यात आला असून त्यापैंकी ७७० मे.टन खताचा साठा संरक्षित करण्यात आला असल्याचेही माहे मे,२०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकरी नेहमीच डीएपी व युरिया यासारख्या रासायनिक खतांना पसंती देतात त्यामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खते उपलब्ध व्हावीत यासाठी जिल्हा परिषद कृषि विभागाने जिल्हाधिकारी, अकोला यांचेमार्फत कृषि आयुक्तांना पत्र देऊन आवंटनानुसार खताचा पुरवठा करण्याबाबत दिनांक ४ मे,२०२२ च्या पत्रान्वये तशी मागणी करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०९-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.

(५) अकोला जिल्ह्यात खरीप हंगाम २०२२ मध्ये दिनांक ०१/०४/२०२२ रोजी एकूण २१७२९ मे. टन खत उपलब्ध होते. तसेच दिनांक ०१/०४/२०२२ ते दिनांक ०४/०७/२०२२ पर्यंत युरिया-१२११३ मे.टन, डीएपी-७५०७ मे. टन, एमओपी- १२२१ मे.टन, संयुक्त खते-१४६९८ मे.टन व एसएसपी-१३१५३ मे.टन असे एकूण ४८६९२ मे. टन खत पुरवठा झालेला आहे. सदर जिल्ह्यामध्ये १३२०.३० मे. टन युरिया व १२२६.१५ मे.टन डीएपी साठा संरक्षित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे आवश्यक त्या तालुक्यामध्ये खत उपलब्ध करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंतप्रधान पीक विमा योजनेबाबत

**(१४) १४२०० (२५-०८-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या पंतप्रधान पीकविमा योजनेत विमा कंपन्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होत असून गुजरात, मध्यप्रदेश ही राज्य या योजनेतून बाहेर पडली असल्याचे दिनांक ७/४/२०२२ च्या रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनही या योजनेतून बाहेर पडण्याच्या तयारीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय त्यामुळे शासनाने या योजने व्यतिरिक्त पर्यायी योजना हाती घेण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१६-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून गुजरात राज्य बाहेर पडले आहे. मध्यप्रदेश या राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना Cup & Cap Model राबविण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय क्र. प्रपीवियो-२०२२/प्र.क्र. ७२ /११-अे, दिनांक ०१/०७/२०२२ अन्वये राज्यात खरीप २०२२ व रब्बी २०२२-२३ हंगामासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना Cup & Cap Model (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक (Area Approach) धरुन राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर मधील सेमिनरी हिल परिसरात वन विभागाच्या ओपन थिएटरची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) १४३९९ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील सेमिनरी हिल परिसरात वन विभागाने बनविलेले ओपन थिएटर ७ वर्षापूर्वी तयार होऊन सुरु करण्यात आले नसल्याने ओपन थिएटरची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ओपन थिएटरची दुरुस्ती करुन ओपन थिएटर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१४-११-२०२२) :** (१) नागपूर मधील सेमीनरी हिल्स परिसरातील ओपन थिएटर ची दुरवस्था झाली आहे, हे खरे नाही.
(२) नागपूर मधील सेमीनरी हिल्स परिसरात वन विभागाने बनविलेले ओपन थिएटर ७ वर्षापूर्वी तयार झाले आहे. ओपन थिएटर व त्यासभोवतालची जागा ही वर्ष २०१८ मध्ये महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांना विविध प्रयोजनार्थ देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर ओपन थिएटर बांबू विकास मंडळ, नागपूर यांचे वापरात आहे. तसेच सदर ओपन थिएटरचा बांबु विकास मंडळ, नागपूर यांचेकडून विद्यार्थी व तरुणामध्ये बांबू बाबत जागरुकता निर्माण करणे व त्याची प्रसिध्दी व प्रचार करण्यासाठी करण्यात येते. बांबूच्या विविध प्रशिक्षणासाठी तसेच बांबू चित्रकला स्पर्धा आयोजित करणेबाबत सुध्दा याचा वापर करण्यात आला आहे. मार्च, २०२२ मध्ये या ठिकाणी बांबू बांधकाम प्रशिक्षण घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जैव उत्तेजकांच्या उत्पादनांची नोंदणी प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) १४४८३ (३०-०६-२०२२) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक १३४१६ ला दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जैव उत्तेजकांच्या (बायोस्टिम्युलंट) यादीतील उत्पादनांना तात्पुरती मान्यता देण्यासाठी कृषि आयुक्तालयाने राबविलेली नोंदणी प्रक्रिया संशयास्पद असल्याची बाब कृषि उद्योजकांनी माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोंदणीसाठी अनेक प्रकरणे प्रलंबित असून अधिकृत चेकलिस्ट दिली जात नसल्याने आयुक्तालयात जी-१ व जी-२ यापैकी नेमकी कोणती प्रक्रिया सुरु आहे हे समजत नसल्याने मागील अनेक दिवसांपासून जी-२ साठी अनेक कंपन्यांचे प्रतिनिधी कृषि आयुक्तालयातील कार्यालयात जाऊनही कोणतीही कायदेशीर व व्यवस्थित माहिती दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जैव उत्तेजक उत्पादनांची नोंदणी पारदर्शक व मर्यादित वेळेत करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाने खत नियंत्रण आदेश १९८५ चे परिशिष्ट ६ अंतर्गत Biostimulant या घटकाचा नव्याने समावेश केला आहे. केंद्र शासनाच्या एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन विभागाने दिनांक ०२/०८/२०२१ च्या पत्रान्वये उत्पादकांनी राज्य शासनास दिनांक ३१/१२/२०२१ अखेर G-१ फॉर्म सादर करण्यास कळविले होते. G-१ फॉर्म सादर झाल्यानंतर १५ ते २० दिवसात G-२ फॉर्म निर्गमित करणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार ११६७ प्रस्ताव विविध कंपन्यांकडून दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत प्राप्त झाले होते. परंतु, कोविड-१९ च्या साथीमुळे फॉर्म-जी-२ देणे शक्य झालेले नाही. तथापि, बायोस्टिम्युलंट (G-२) करीता दिनांक ०५/०७/२०२२ अखेर १५०२ प्रस्ताव प्राप्त असून त्यापैकी १२१७ प्रस्तावांना G-२ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहेत. उर्वरित २८५ प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळल्याने कंपनीस्तरावर प्रलंबित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील रासायनिक खतांच्या किंमतीतील दरवाढ रोखून शेतकऱ्यांना रास्त भावात रासायनिक खत उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) १४५६३ (३०-०६-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात खरीप हंगामात रासायनिक खत उत्पादन कंपन्यांनी खतांच्या किंमतीत १५ ते १७ टक्क्यांनी वाढ केल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोविड संसर्गामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना खतांच्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी खतांच्या किंमती कमी करण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भंडारा जिल्ह्यातील रासायनिक खतांच्या किंमतीतील दरवाढ रोखून शेतकऱ्यांना रास्त भावात रासायनिक खत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्रीय खत विभागाने २७ एप्रिल, २०२२ रोजी खरीप हंगाम २२ (१ एप्रिल, २०२२ ते ३० सप्टेंबर, २०२२) या कालावधीकरीता रासायनिक खतांचे अनुदान दर घोषित केले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत वाढीव अनुदानामुळे डिएपी व १०:२६:२६, १२:३२:१६, २०:२०:०:१३ या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना

लोकप्रिय असणाऱ्या खतांच्या किंमती शेतकऱ्यांना परवडणाऱ्या राहिल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना खतांच्या दर वाढीमध्ये दिलासा मिळाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रत्येक जिल्ह्यात कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी) रुग्णालय उभारण्याबाबत

**(१८) १४७४९ (२८-०६-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक कामगारांना व गरजवतांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी) किमान ३० बेडचे एक रुग्णालय उभारण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामंडळाच्या दहा किलोमीटर पुढे एक रुग्णालय ही अट काढण्यात येणार असून लोकसंख्या तसेच आवश्यकतेनुसार रुग्णालय उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने प्रत्येक जिल्ह्यात कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी) किमान ३० बेडचे रुग्णालय उभारण्याबाबतचा आराखडा तयार केला आहे काय,
(४) असल्यास, सुरु असलेल्या रुग्णालयांना निधी देऊन रुग्णालये अद्ययावत तंत्रज्ञानाने जोडण्याकरीता व रुग्णालयात मंजूर असलेले कर्मचारी व इतर मूलभूत सेवा-सुविधा पुरविण्याकरीता व आराखाड्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात रुग्णालय उभारण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या "राज्य कामगार विमा अधिनियम १९४८" अन्वये श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत "राज्य कामगार विमा योजना" राबविली जात असून सदर योजनेंतर्गत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थींना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.

राज्य कामगार विमा महामंडळाने दिनांक ०६/०७/२०२२ अन्वये प्रत्येक जिल्ह्यात राज्य कर्मचारी विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी.) किमान ३० बेडचे एक रूग्णालय उभारण्यात येणार असल्याची बाब खरी नसल्याचे कळविले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नवीन ई.एस.आय.सी. रुग्णालय स्थापनेकरीता सद्य:स्थितीत असलेल्या दोन रुग्णालयांमधील अंतरासंदर्भातील तरतूद पूर्णपणे हटविण्याबाबतचा कोणताही निर्णय राज्य कामगार विमा महामंडळाकडून तूर्तास घेण्यात आलेला नाही.

तथापि, विमाधारकांच्या (Insured Persons i.e. IP) सद्य:स्थितीतील लोकसंख्येसोबत भविष्यकालीन वाढीचा अंदाज (नवीन रुग्णालय स्थापनेकरीता भविष्यातील ५ वर्षांची वाढ व सेवा दवाखाना स्थापन करण्याकरीता ३ वर्षांतील वाढ) घेऊन नवीन रुग्णालयांची व सेवा दवाखान्यांची स्थापना करण्यात येणार असल्याचा निर्णय राज्य कामगार विमा महामंडळाच्या १८८ व्या बैठकीत घेण्यात आला आहे.

शासनाने दिनांक २२/०६/२०२१ अन्वये चाकण, जळगाव, सातारा, शेंद्र, रोहा, पेण, तारापूर, सिन्नर, तळोजा या ठिकाणी ०९ नवीन राज्य कामगार विमा रूग्णालये स्थापित करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने राकावि महामंडळाने त्यांच्या १८८ व्या बैठकीमध्ये महाराष्ट्रात चाकण, जळगाव, सातारा, पेण, तारापूर व पनवेल येथे ०६ नवीन राज्य कामगार विमा रूग्णालये सुरू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.

तसेच प्राथमिक वैद्यकीय सुविधेअंतर्गत कार्यरत ५१ सेवा दवाखान्यांच्या जोडीला १२४ नवीन सेवा दवाखाने सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यापैकी सद्य:स्थितीत २७ नवीन सेवा दवाखाने सुरु करण्यात आले आहेत.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

(५) निरंतर प्रकिया असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने बांधकाम करणाऱ्या कामगारांना भोजनाऐवजी रोख रक्कम देण्याबाबत

**(१९) १४७८१ (१२-०७-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने बांधकाम करणाऱ्या कामगारांना मोफत मध्यान्ह भोजनाची योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोखरी, साकेगाव व खामगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील नोंदणीकृत कामगार भोजन घेत नसून त्यांनी भोजनाऐवजी रोख रक्कम देण्याची मागणी केल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोखरी येथे २०० कामगार असून त्यात पाच कामगार या भोजनाचा लाभ घेत असून बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेत नसल्याने मध्यान्ह भोजनासाठी शासनाचे लाखो रुपये खर्च होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मोफत मध्यान्ह भोजन योजनेमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन नोंदणीकृत बांधकाम कामगारांना भोजनाऐवजी रोख रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१०-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

वैजापूर तालुक्यातील पोखरी, साकेगांव व खामगांव इत्यादी बांधकाम कामाच्या ठिकाणी/नाक्याच्या ठिकाणी सुमारे २५० बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिनांक ०६/०३/२०२२ पासून दिला जात आहे. सदरच्या ठिकाणी कामकाज कमी झाल्याने व कामगारांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे दिनांक ०१/०५/२०२२ पासून ते आजतागायत ६० बांधकाम कामगारांना या योजनेचा लाभ दिला जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील आरोग्य उपसंचालक कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पध्दतीने त्याच कार्यालयात पदोन्नती दिल्याबाबत

**(२०) १४८८३ (२८-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील आरोग्य उपसंचालक कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांना सेवाअंतर्गत प्रशिक्षण घेतल्यानंतर परीक्षेचा निकाल येण्यापूर्वीच नियमबाह्य स्वरुपात त्याच कार्यालयात पदोन्नती देण्यात आली असल्याची तक्रार सहसंचालक आरोग्य सेवा, आयुक्त आरोग्य सेवा, अभियान संचालक यांच्याकडून करण्यात येवून तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याची मागणी केली असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य उपसंचालक कार्यालयात नियमबाह्य स्वरुपात वर्षानुवर्षे त्याच कार्यालयात पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वागणूकीचा त्रास जिल्ह्यातील अधिनस्त रुग्णालयीन कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक कर्मचाऱ्याची एकदा आदिवासी भागात किंवा नक्षलग्रस्त भागात बदली करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने यापूर्वी पारीत केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने नियमबाह्य पध्दतीने करण्यात आलेल्या नियुक्त्या रद्द करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

उपसंचालक, अकोला हे कार्यालय एकूण ५ जिल्ह्यांचे परिमंडळ कार्यालय आहे. येथे कामाची व कर्मचाऱ्यांची निकड लक्षात घेता पर्यवेक्षीय कार्यालय म्हणून अधिकारी /कर्मचारी कार्यरत असणे आवश्यक आहे. बदली अधिनियमानुसार एकाच ठिकाणी /एकाच पदावर सहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेले कर्मचाऱ्यांची बदली करण्यात येते. सद्य:स्थितीत एकाच ठिकाणी / एकाच पदावर सहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेले कर्मचारी उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला कार्यालयात कार्यरत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

बदली व पदोन्नती या नियतकालीक प्रक्रिया आहेत. त्यानुसार आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रातही संबंधित संवर्गातील पदांवर बदलीने तसेच पदोन्नतीने आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रातही रिक्त पदांवर बदल्या देण्यात येतात.

(४) पदोन्नती प्रक्रियेच्या अनुषंगाने सदर पदोन्नतीमध्ये अनियमितता झाली किंवा कसे याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.